महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. : मआ/मुले/११०२
दिनांक : ३१/०७/२०२०

## कार्यालय परिपत्रक

**विषय : सन २०२१-२२ चे महानगरपालिका अंदाजपत्रक -नागरिकांचा सहभाग.**

सन २००६-०७ पासून महानगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांच्या सूचनेनुसार आवश्यक कामांचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करणे असा उपक्रम पुणे शहरात करण्यात आला आहे. सदर उपक्रमास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाकडे विनामूल्य अर्ज उपलब्ध असतात. सन २०२०-२१ मध्ये उद्भवलेल्या कोव्हीड-१९ प्रादुर्भावामुळे नागरिकांनी सुचवलेली कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करणेकरिता online पद्धतीचा पर्याय नागरिकांना उपलब्ध होण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कार्यवाही चालू आहे. त्यानुसार सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक तयार करताना महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे स्तरावर नागरिकांकडून त्यांच्या प्रभागात करावयाच्या कामांबाबतच्या सूचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा व वेळापत्रकाचा अवलंब करण्यात यावा.

१. मा.प्रभाग समिती अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली प्रभाग समितीची बैठक प्रस्तुत प्रयोजनाचे विचारार्थ बोलविण्यात यावी, त्या बैठकीमध्ये प्रभाग समिती सदस्यांबरोबर नागरिकांच्या अंदाजपत्रक सहभागाबाबत चर्चा घडवून आणावी. नागरिकांच्या सहभागातून अंदाजपत्रक तयार करणेबाबतचा प्रारूप कार्य आराखडा तयार करण्यात यावा.

२. प्रभाग समितीने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित प्रभागातील नगरसेवक यांच्या अध्यक्षतेखाली दैनिक वृत्तपत्रात जाहीर आवाहन करुन नागरिकांकडून कामाचे प्रस्ताव दि.०३/०९/२०२० अखेर मागविण्यात यावे.

३. प्रभागामध्ये चार सदस्यांचा प्रभाग असल्यास त्या प्रभागास कमाल रक्कम रुपये १ कोटी तसेच ३ सदस्यांचा प्रभाग असल्यास कमाल रक्कम रुपये ७५ लाखाची मर्यादा ठेवावी. तसेच एका कामाची रक्कम रुपये ५ लाखापेक्षा जास्त नसावी.

४. नागरिकांकडून आलेले प्रस्ताव मा.प्रभाग समितीकडे अंतिमतः प्राधान्यक्रम ठरविणे व मान्यतेसाठी पाठविण्यात यावे.

५. मा.प्रभाग समितीच्या मान्यतेनंतर महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व प्रभागाची एकवट माहिती, नियतकालिक अर्थसंकल्प विचारार्थ महापालिका आयुक्त यांचेकडे विहित नमुन्यात दि.०७/१०/२०२० पर्यंत सादर करावी.

कळावे,

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

**प्रत :** १. परिमंडळ क्र.१ ते ५
२. महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय १ ते १५
पुणे महानगरपालिका.

यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी ...